नि. दिवाणी दावा क्र. 235/2013
सतीष / बाबुराव व इतर

## नि. 5 वरील आदेश

1. वादीने प्रस्तुत अर्ज तात्पुरता मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे. अर्जातील कथन असे कि, मौजे नळदुर्ग ता. तुळजापूर येथील जमीन गट क्र. 236/1/4, क्षेत्र 08 हे 10 आर, आकार 05 रू. पैकी पुर्व–दक्षिण कोप–यातील जागा पूर्व–पश्चिम 40 फूट व दक्षिण–उत्तर 40 फूट ज्याची चतु:सिमा पुर्वेस खुली जागा व त्यापलीकडे बालाघाट कॉलेज, पश्चिमेस व उत्तरेस 236/1/4 पैकी खुली जागा व दक्षिणेस हायवे नं. 9 आहे. सदर चतु:सिमेच्या आतील घरजागा त्यामध्ये पत्र्याचे शेड, कॅन्टीन व दगड–माती इत्यादी. वादीचे कथन असे की, वादी हा महार जातीचे आहे. सदरची मिळकत मूळ मालक ईश्वर धुळीराम कांबळे यांची होती. मा. जिल्हाधिकारी यांनी सदरची मिळकत महार लोकास दिलेली आहे. ईश्वर कांबळे मयत असून सध्या जमीन मिलींद ईश्वर कांबळे याचे नांवे आहे. सन 1993 पासून वादीचे दावा मिळकतीमध्ये "मित्र टी हाऊस" नावाचे किरकोळ चहा व दूध विक्रीचे दुकान केलेले होते. वादी हा शेड बांधून, खिळगा रचून राहात होता व आहे. वादीने विद्युत मंडळाकडून रितसर अर्ज करून डिमांड भरून लाईट घेतलेली आहे, तसेच सदर जागेचा कर नगरपरिषदेला भरत आहे व नंतर वादीला नगरपरिषद नळदुर्ग येथे नोकरी लागल्याने सध्या चहाचे दुकान बंद केले आहे परंतु वादी त्यामध्ये राहण्यास आहे. प्रतिवादींचा दावामिळकतीशी कोणताही हक्कसंबंध नसताना वादीच्या कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करीत आहेत दि. 13.07.2013

रोजी मोबाईल 9096694460 या नंबरवरून फोन करून वादीला धमकी दिली कि, ''तु तुझे घर काढून घे नाहीतर आम्ही त्याची मोडतोड करू'. दि 13.07.2013 रोजी दुपारी 4.00 वाजता वादी घरी नसल्याचे पाहून प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांनी बुलडोझरचे सहायाने दावामिळकतीमधील खिळगा पाडला. वादीने प्रतिवादींविरूध्द पोलीस ठाणे नळदुर्ग येथे लेखी तकार दिली आहे. प्रतिवादींचे सदरचे कृत्य चालू राहिल्यास वादीचे पैशाच्या स्वरूपात न भरून येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. वादीस प्रथमदर्शनी केस आहे व अनुकूलतेचा कल वादीच्या बाजूने आहे. त्यामुळे प्रतिवादींविरूध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

2. प्रतिवादींनी नि. 21 वरती आपले लेखी म्हणणे व दाव्याचे कैफियत दिले आहे. प्रतिवादींचे कथन असे कि, वादीने जमीन सर्व्हे/गट नं. 236/1/4 मध्ये नमूद केलेले क्षेत्र चुकीचे आहे. दाव्यात चतु:सिमा चुकीच्या नमूद केलेल्या आहेत. दावामिळकतीत पत्र्याचेशेड, कॅन्टीन वगैरे नव्हते व नाही. सदरची जमीन मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी ईश्वर धुळीराम कांबळे व इतर महार लोकांना दिली आहे व त्यामध्ये प्रतिवादींचा समावेश आहे. वादीचा दावामिळकत नं. 236/1 किंवा 236/1/4 मध्ये काहीही संबध नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

3. अर्ज व म्हणणे यावरून उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत –

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | सकृतदर्शनी प्रकरण वादींचे बाजूस असल्याचे वादी सिध्द करते का ? | होय. |
| 2. | अनुकूलतेचा कल वादीचे बाजूस आहे का ? | होय. |
| 3 | प्रतिवादींविरूध्द तुर्तातुर्त ताकीद न दिली गेल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल असे वादी सिध्द करते का ? | होय. |
| 4. | आदेश काय ? | अर्ज मंजूर केला. |

## कारणमिमांसा

4. मुद्दे क्रमांक 1 ते 3 :–

अर्ज व म्हणणे वाचली. दोन्ही पक्षकारांच्या मा. वकीलांचे युक्तिवाद ऐकले. वादीचे कथन असे कि, मौजे नळदुर्ग ता. तुळजापूर येथील गट क्र. 236/1/4, क्षेत्र 08 हे 10 आर, आकार 05 रू. पैकी पुर्व–दक्षिण कोप–यातील जागा पूर्व–पश्चिम 40 फूट व दक्षिण–उत्तर 40 फूट ही वादमिळकत असून वादी त्याचा कब्जेवहीवाटदार आहे. वादीचे कथन असे कि, सदर अर्जात नमूद केलेल्या मिळकतीमध्ये सन 1993 पासून वादीचे मित्र टी हाऊस या नावाचे किरकोळ चहा विक्रीचे दुकान आहे व सदर मिळकतीत वादी शेड बांधून खिळगा रचून त्यामध्ये राहत आहे. तसेच त्यामध्ये लाईट घेतलेली आहे व नगर परिषदेला कर भरत आहे. वादीचे कथन असे कि, दाव्यात नमूद केलेल्या चतु:सिमा या सर्व्हे नं. 236/1 च्या पूर्ण क्षेत्राच्या दिलेल्या आहे व त्यामध्ये पुर्व–दक्षिण कोप–यातील जागा पूर्व–पश्चिम 40 फूट व दक्षिण–उत्तर 40 फूट

ही वादीच्या कब्जेवहीवाटीस आहे. वादीने आपल्या कथनाच्या पुष्ठर्थ सदर मिळकत गट/सर्व्हे क्र. 236/1/4 चा 7/12 उतारा नि. 8 वर आहे. वादीने नि. 4 सोबत अनुक्रमांक अ व ब वरती नगर परिषद नळदुर्ग येथे कर भरल्याच्या पावत्या दाखल केले आहे, तसेच वीज बील भरणा केलेल्या पावत्या अनुक्रमांक ए ते डी वरती दाखल केलेल्या आहेत व त्या वादीच्या नावाच्या आहेत व त्या नळदुर्ग येथील नळदुर्ग बालाघाट रस्त्यावर असल्याचे दिसून येते. तसेच सदरचे विद्युत कनेक्शन हे रहिवाशी स्वरूपाचे दिसून येते. तसेच वादीने विद्युतबील भरल्याबाबत पावत्या अनुक्रमांक ए व बी वर दाखल केल्या आहेत. वादीने शासनाला प्रदान केलेल्या रक्कम रूपये 1600/— ची पावती दिसून येते. वादीने नि. 39 वर सर्व्हे क्र. 236/1 चा टोच नकाशा जोडलेला आहे. सदर नकाशामध्ये असे दिसून येते कि, सदर मिळकतीच्या पूर्व बाजूला बालाघाट कॉलेज नमूद केले आहे. वादीने नि. 34 सोबत 1 येथे लोकांची उधारीची वही दाखल केलेली आहे. सदर वहीमध्ये असे नमूद केले आहे कि, सदर चहाचे दुकान बालाघाट कॉलेज जवळ, हायवे नं. 9 वरती आहे. तसेच सदर वहीमध्ये नमूद केलेल्या खातेदारांची नांवे पाहिले असता जास्तीत जास्त सर (प्राध्यापक) लोकांची नांवे नमूद केलेली आहेत. उदा. श्री. एस. आर. माने सर, श्री. बोंबळ सर, आय. टी. आय. बी व्ही गायकवाड, श्री. चनशेटटी सर, घुगे सर, चिंचोले सर, लक्ष्मण कल्याण मुळे, श्री. शिंदे सर, राठोड सर, श्री. पाथ्रीकर सर, डोने मॅडम, काझी सर, एम.एन गायकवाड सर. यावरून कॉलेजच्या जवळ दावामिळकतीत वादीचे मित्र टी हाऊस नावाचे चहाचे दुकान व रहिवास असल्याचे दिसून येते. कारण दावामिळकतीला चिटकून पूर्व बाजूला सदर कॉलेज असल्याचे नि. 39 मधील नकाशावरून दिसून येते.

5. प्रतिवादीचे कथन असे कि, दावामिळकतीत अगर इतर कोठेही वादीचे मित्र टी हाऊस नावाचे चहाचे दुकान नाही. प्रतिवादींनी नि. 25 वरती सर्व्हे क्र. 236/1/4 चा नकाशा दाखल केलेला आहे. परंतु तो नकाशा गट क्र. 236/1/4 क्षेत्र 4हे 5 आर या पुरताच मर्यादित असल्याचे दिसून येते व दुसरा तुकडा 4 हे. 5 आर. असल्याचे दिसून येते कारण पूर्ण जमीन गट नं. 236/1 याचे क्षेत्र. 8 हे 10 आर आहे. प्रतिवादींनी त्याच्या बचावाचा पुष्ठर्थ मिलिंद कांबळे, कैलास नारायण भोसले यांचे शपथपत्र दाखल केले आहे. प्रतिवादींनी आणखी आसीफ शेख याचे शपथपत्र दाखल केले आहे व सदर साक्षीदार याने कथन केले आहे कि, वादीचे दावाजागेत केंव्हाही पत्र्याचे शेड नव्हते व नाही तसेच शेडच्या बाहेरील बाजूस दगडी खिळगा नाही. वादीने विद्युत जोडणी घेतलेली नाही. सदर साक्षीदार याचे कथन प्रथमदर्शनी विश्वसनीय वाटत नाही कारण वादीने दाखल केलेली उधारी वहीमध्ये सदर साक्षीदाराचे उधारीचे खाते आहे. व सदर साक्षीदार आसीफ शेख याने वादीच्या चहादुकानामध्ये उधारीने चहा घेतल्याचे दिसून येते. सदर साक्षीदार याचे उधारीच्या वहीतील त्याची सही व त्याने दाखल केलेली शपथपत्रातील सही एकसारखीच असल्याचे दिसून येते. सदर पुराव्यावरून प्रथमदर्शनी वादीचा दावामिळकतीत कब्जा असल्याचे दिसून येते.

6. वादीचे वकील श्री. कुलकर्णी यांनी खालील न्यायनिर्णय दाखल केले आहे.

*Praqtaprai N.Kothari Vr. John Braganza on 4 May 1999 reported in 1999 AIR SC 1666".*

> *"in which it is held by Their Lordships that, a person who has been in long continuous possession can protect the same by seeking an injunction against any person in the world other than true owner".*

सदरचे तत्व माझ्यापुढील केसला लागू पडते. माझ्यापुढील केसमध्ये वादीचे बराच काळापासून दावामिळकतीत ताबा दिसून येते. तसेच वादीने प्रतिवादीविरूध्द मनाई हुकूम मागितला आहे. सदर प्रतिवादी हे दावामिळकतीचे मालक असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे तत्व माझ्या पुढील केसला लागू आहे.

7. वादीचे कथन असे आहे कि, दिनांक 13.07.2013 रोजी दुपारी 4.00 वाजता यातील प्रतिवादी यांनी बुलडोजरच्या सहायाने बेकायदेशीररित्या दावामिळकतीतील खिळगा पाडला. वादीने त्यावेळी ताबडतोब पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली. प्रतिवादींचे कथन असे कि, दावामिळकतीत वादीचा कब्जा नाही यावरून प्रतिवादी हरकत अडथळा करतात असे दिसून येते. तसेच वादीने नि. 4 सोबत 2 येथे दि. 17.7.13 रोजी पोलीस स्टेशन नळदुर्ग, तहसीलदार तुळजापूर, मुख्याधिकारी न.प. नळदुर्ग, जिल्हाधिकारी साहेब, उस्मानाबाद, पोलीस अधिक्षक साहेब उस्मानाबाद व मुख्यमंत्री व गृहमंत्री यांचेकडे तकारी अर्ज दिल्याबाबत प्रत दाखल केली आहे. यावरून वादीच्या कब्जेवहीवाटीस प्रतिवादीकडून हरकत अडथळा झाल्याचे दिसून येते. प्रथमदर्शनी केस, अनुकूलतेचा कल वादीच्या बाजूने आहे. प्रतिवादीविरूध्द तुतातुर्त ताकीद न दिली गेल्यास वादीचे अपरिमीत कधीही न भरून येणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब मी मुद्दे क्र. 1 ते 3 चे उत्तर

होकारार्थी दिले व मुददा क्र. 4 करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

1. अर्ज मंजूर करण्यात येतो.

2. मौजे नळदुर्ग ता. तुळजापूर येथील जमीन गट क्र. 236/1, क्षेत्र 08 हे 10 आर, आकार 05 रू. पैकी पुर्व—दक्षिण कोप—यातील जागा पूर्व—पश्चिम 40 फूट व दक्षिण—उत्तर 40 फूट या वादमिळकतीतील वादीच्या कब्जेवहीवाटीस प्रतिवादींनी स्वतः अथवा इतरांमार्फत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत कुठल्याही प्रकारे हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई आदेश प्रतिवादींविरूध्द देण्यात येतो.

3. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( दि. म. गिरी. )
सह दिवाणी न्यायाधिश, क स्तर.
तुळजापूर.

तुळजापूर.
दिनांक : 19.04.2014